**7.1.9**


## Activities in the Institution for inculcating values for being responsible citizens as reflected in the Constitution of India

One of the important visions of the college is "*Developing critical and analytical thinking in terms of social justice*". Treating unequal people equally is social justice, for this there must be a conscientization which means building perception about the social order. College nurtures constitutional culture to develop critical thinking and the end objective is to inculcate rational thinking.

The Indian constitution is firmly grounded in the key values of liberty, equality and justice, with the foundational support of the values of fraternity and dignity. To inculcate the constitutional values among the students and to imbibe deeply among them is the challenge to any academic institute. The institute has successfully implemented such constitutional culture in its practice. The institution highly believes in the democratic nation where everybody enjoys his or her rights within the constitutional limits. Constitutional culture and values are nurtured throughout the year and it reflects in the activities of the institution. Preamble of constitution is displayed permanently at the corridor, and on constitution day teachers and students read the preamble. The following programmes highlights the efforts towards nurturing of constitutional culture:

**2015-16**

1. A Special Guest Lecture on "Globalization and Common Man" by Mr. Pannalal Surana, Aurangabad.



2. Indian Constitution Awareness Exam
3. Seminar on ‘Indian Constitution and Reservation’ ( 25 Nov. 2015 )




4. Educational visit at State Assembly, Nagpur on 9 Dec. 2016.



- Padmashri ***Dr. Sukhdeo Thorat***, Ex. Chairman UGC and Chairman of ICCSSR discussed with the gathering on Constitutional Culture,

**Priyadarshini Mahila Mahavidyalaya Wardha**

Dec 15, 2015 • • View Thread

वंचित समाज घटकांमध्ये संसाधनांच्या समन्यायी वाटपाकरीता व देशाच्या सर्वसमावेशी विकासाकरीता तयार करावयाच्या संवैधानिक दबाव गटाबाबत युजीसी चे माजी अध्यक्ष व जागतिक स्तरावरील आजच्या घडीचे एक आघाडीचे अर्थशास्त्रज्ञ पद्मश्री प्रो डॉ सुखदेव थोरात यांनी आमच्या महाविद्यालयात वर्धेच्या परिवर्तनवादी चळवळीत काम करणा-या कार्यकर्त्यांशी व नागरिकांशी संवाद साधला ( ता.14 जाने. 2015).



5. " Samata Parv" Lecture Series ( 11th -14th April 2016 ) On the occasion of 125th Birth Anniversary year of Dr. Babasaheb Ambedkar,

**Priyadarshini Mahila Mahavidyalaya Wardha** is with **Vinod Jamnare** and **11 others**.

Apr 13, 2016 • • View Thread

समतापर्व व्याख्यानमालेतील दुसरे पुष्प आज दिनांक १२ एप्रिल रोजी स्त्रीवादी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्या प्रा. नुतन माळवी यांनी सम्यक बुध्द विहार, प्रबुद... See More



**Priyadarshini Mahila Mahavidyalaya Wardha** is with **Tejal Kitey Yende** and **10 others**.

Apr 14, 2016 • • View Thread

महाविद्यालयाच्या डॉ आंबेडकर अभ्यास केंद्राच्या वतीने आयोजित समतापर्व व्याख्यानमालेतील अंतिम चौथे पुष्प आज  १४ एप्रिल रोजी सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष व... See More



# राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंती वर्ष



# समतापर्व व्याख्यानमाला

११ एप्रिल : महात्मा फुले जयंती ते १४ एप्रिल : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती



आयोजक

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्र
## प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय, वर्धा

### ।। पुष्प पहिले ।।

**सोमवार दि.११ एप्रिल २०१६ वेळ : सायं.६.३० वा.**

• प्रमुख वक्ते •

**प्रा.डॉ.भूषण रामटेके**

(आंबेडकरी कवी व विचारवंत, पुलगांव)

विषय : फुले-आंबेडकरी विचार सुदृढ समाज निर्मितीसाठी अनिवार्य.

**प्रा.प्रमोद नारायणे**

(यशवंत महाविद्यालय, वर्धा)

विषय : महात्मा फुले यांचे क्रांतिकार्य व त्यांचे समकालीन.

स्थळ : नालंदा बुद्ध विहार, बुद्धनगर (गौरक्षण वार्ड), वर्धा.

### ।। पुष्प दुसरे ।।

**मंगळवार दि.१२ एप्रिल २०१६ वेळ : सायं.६.३० वा.**

• प्रमुख वक्ते •

**प्रा.नुतन माळवी**

(महाराष्ट्रातील स्त्रीवादी कार्यकर्त्या व विचारवंत)

विषय : स्त्रियांचे प्रश्न व डॉ. आंबेडकर

**स्थळ : सम्यक बुद्ध विहार, सांस्कृतिक भवन,**
प्रबुद्धनगर, म्हसाळा, वर्धा.

### ।। पुष्प तिसरे ।।

**बुधवार दि.१३ एप्रिल २०१६ वेळ : सायं.६.३० वा.**

• प्रमुख वक्ते •

**आयु. राम उमरे**

(सेवानिवृत्त प्राचार्य, देवळी, जि. वर्धा)

विषय : डॉ. आंबेडकरांच्या धम्मक्रांतीची सामाजिक फलश्रुती.

**स्थळ : भीमरत्न बुद्ध विहार,**
गजानन नगर, वर्धा.

### ।। पुष्प चौथे ।।

**गुरुवार दि.१४ एप्रिल २०१६ वेळ : सकाळी ८ वा.**

• प्रमुख वक्ते •

**डॉ. अशोक चोपडे**

(अध्यक्ष, सत्यशोधक समाज, महाराष्ट्र राज्य)

विषय : फुले आंबेडकरी दृष्टिकोन व सद्यस्थिती.

**स्थळ : वर्ग खोली क्रमांक १**
प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय,
सावित्रीबाई फुले ज्ञानमार्ग, न्यू नालवाडी वर्धा.

* विनीत *

**डॉ. रंभा सोनाये**
प्राचार्य,
प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय, वर्धा

**डॉ. सुधाकर सोनोने**
समन्वयक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्र

**डॉ. प्रियराज महेशकर**
सह समन्वयक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्र

- **नालंदा बुद्ध विहार**, बुद्ध नगर, गौरक्षण वार्ड, वर्धा – दिनेश भगत (स्थानिक व्याख्यान संयोजक), माधवराव कस्तुरे, योगेश नारायणे, रवि ढोबळे, सरीता कांबळे, कुसूम नगराळे, रेणुका पाटील, महेश गावंडे, मीराताई गोटे, कांताबाई कांबळे, सिद्धांत कांबळे, नितीन सुटे, नितीन धारगावे, विलास येसनकर, पुष्पलता सोनारकर, शुभांगी भगत
- **सम्यक बुद्ध विहार**, प्रबुद्ध नगर, म्हसाळा, वर्धा – सुनिल ढाले (स्थानिक व्याख्यान संयोजक), इंजि. अविनाश पाटील, सावित्री नाखले, भगिरथी बोरकर, रवि निखाते, संघरत्न रामटेके, जयभिम राऊत, डॉ. प्रकाश कांबळे, नागोराव शंभरकर, मनोज राऊत.
- **भीमरत्न बुद्ध विहार**, गजानन नगर, वर्धा – रामदासजी बन्सोड (स्थानिक व्याख्यान संयोजक), प्रा. शिवाजी चाटसे, प्रा. लोकेश नंदेश्वर, तुकारामजी भगत, कमलाताई कांबळे, नंदिनी मेश्राम, लतिका सुटे, यशोधरा रामगाडगे, रेखा जीवने
- **प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय**, वर्धा – डॉ. अनिता देशमुख, डॉ. मालिनी वडतकर, डॉ.प्रतिभा ताकसांडे, डॉ.धनंजय सोनटक्के, प्रा.सोनाली सिरभाते, डॉ. रेखा बांबडे, प्रा.मदनमोहन विश्वकर्मा, प्रा. प्रदिप दखणे, प्रा. दीपक महाजन, प्रा. तेजल किटे, प्रा. समता चिकाटे, प्रा.निलीमा भोपळे, प्रा. वैशाली मेघळ, प्रा. रुपाली आसई, विजय चौधरी, प्रमोद माथनकर, विनोद बावणे, नरेश आगलावे, राजू मुंजेवार, विजय राऊत, सुनंदा मानकर

संपर्क : ९७६४९४७५९५

**2016-2017**

1. ***World Indigenous Peoples Day*** ( 9 August 2016 )




2. **Azadi 70**. ***" 70 Saal Azadi – Jara Yad Karo Kurbani",*** as per the guidelines of Human Resource development Ministry.



3. ***A Special Guest Lecture of Dr. Dattaprasad Dabholkar*** on Swami Vivekanand's thoughts on making of modern India.



4. ***A Special Guest Lecture of Pannalal Surana***. ( 19 Sept. 2016 ) on cultural nationalism






**पन्नालाल सुराणा : 'सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि स्त्री'वर व्याख्यान**

# सांस्कृतिक राष्ट्रवाद मूळप्रश्न दडपण्याचे हत्यार

वर्धा : शेतकऱ्यांच्या होणाऱ्या पिळवणुकीच्या विरोधातून भारतातील ब्रिटीश विरोधी स्वातंत्र्यलढा उभा राहिला होता. तो लढा हा मूलतःच धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाच्या पायावर उभा होता. पण ज्यांना बहुजनांवर सांस्कृतिक अधिपत्य हवे होते त्यांना ते सोयीचे नसल्यामुळे राष्ट्रवादाला भारतमाता, गोमाता अशा सांस्कृतिक प्रतिकांचे अस्तर देऊन देशातील मूलभूत प्रश्न दडपले आहे, असे परखड मत ज्येष्ठ समाजवादी विचारवंत पन्नालाल सुराणा यांनी व्यक्त केले.

'सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि स्त्री' या विषयावर घेण्यात आलेल्या व्याख्यानात ते बोलत होते. स्थानिक प्रियदर्शिनी महिला महाविद्यालयातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्र व समाजविज्ञान अभ्यास मंडळाच्या वतीने सोमवारी विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रंभा सोनाये तर अतिथी म्हणून अंनिसचे राज्य सरचिटणीस गजेंद्र सुरकार, डॉ. सुधाकर सोनोने, डॉ. प्रियराज महेशकर उपस्थित होते.

विचार व्यक्त करताना पन्नालाल सुराणा व मंचावरील मान्यवर.

मुळात निसर्गाशी संबंधित असलेल्या बहुजनांच्या सण, उत्सवांना व कला प्रकारांना धार्मिक कल्पना चिटकवून सांस्कृतिक अधिपत्य उभारण्याची प्रक्रिया विशद करताना सुराणा म्हणाले, ब्रिटीशकाळात हिंदू हा प्रदेशवाचक शब्द जनगणनेच्या रुपाने धार्मिक समुदायात रुपांतरित करण्यात आला. त्या आधारे वर्णवर्चस्ववादी राजकारण उभारले गेले. या राजकारणात केवळ मुलांना जन्म देणारी माता एवढ्यापुरतेच स्त्रियांचे स्थान आहे. यातूनच स्त्रीयांनी दहा मुलांना जन्म द्यावा अशी भाषा येते.

यानंतर विद्यार्थिनींनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन सुराणा यांनी केले. प्राचार्य डॉ. सोनाये यांनी बहुजन राजा बळीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या विकृतीकरणावर भाष्य केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्र प्रमुख डॉ. सुधाकर सोनोने यांनी केले.

संचालन डॉ. प्रियराज महेशकर यांनी तर आभार डॉ. धनंजय सोनटक्के यांनी मानले. डॉ. मालिनी वडतकर, डॉ. अनिता देशमुख, डॉ. प्रतिभा ताकसांडे, प्रा. सोनाली सिरभाते, प्रा. दीपक महाजन, प्रा. अमोल घुमडे, प्रा. समता चिकाटे, प्रा. तेजल किटे यासह विद्यार्थिनी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होत्या.(स्थानिक प्रतिनिधी)

5. World Human Rights Day ( 10 Dec. 2016 )




6. Workshop on Superstition Eradication and Scientific Temperament Development in collaboration with *Akhil Bhartiya Andhhashraddha Nirmulan Samittee*, Wardha (8 Jan.2017)






**2017-2018**

***1)*** Constitution Day ( 26 Nov. 2017 ) ***Reading of Constitution Preamble***



**2018-19**

1) ***August Kranti Din***. ( 9th August 2018 ) Lecture of Dr. Virendra Bais,




सकाळ

# इतिहासाचे विस्मरण होऊ देऊ नका

## डॉ. वीरेंद्र बैस : प्रियदर्शिनी महिला महाविद्यालयात ऑगस्ट क्रांतिदिन

वर्धा, ता. ९ : आज जे स्वातंत्र्य आपल्याला प्रिय आहे. ते मिळविण्यासाठी हजारो देशभक्तांचे श्रम आणि रक्त सांडले आहे. याची जाण व स्थानिक इतिहासाचे भान आजच्या तरुणाईने ठेवणे गरजेचे आहे, असे मत विदर्भ इतिहास परिषदेचे अध्यक्ष व यशवंत महाविद्यालयाचे इतिहास विभागप्रमुख डॉ. वीरेंद्र बैस यांनी येथे व्यक्त केले.

स्थानिक प्रियदर्शिनी महिला महाविद्यालयात समाजविज्ञान अभ्यास मंडळाच्या वतीने महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त ऑगस्ट क्रांतिदिनी आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य



वर्धा : मार्गदर्शन करताना डॉ. वीरेंद्र बैस; मंचावर उपस्थित मान्यवर.

डॉ. रंभा सोनाये होत्या. तर इतिहास विभागप्रमुख डॉ. प्रियराज महेशकर व विद्यापीठ प्रतिनिधी मोना मेश्राम आदींची उपस्थिती होती.

डॉ. वीरेंद्र बैस पुढे म्हणाले, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या खंजिरी भजनाने जी देशभक्ती वैदर्भीय लोकांमध्ये निर्माण केली. त्यातूनच चिमूर व आष्टीचा संग्राम घडला. संपूर्ण भारतभर वेगाने पसरलेल्या या चलेजाव आंदोलनाचीच परिणती म्हणजे आपल्याला मिळालेले स्वातंत्र्य होय. त्यात आपल्या वर्धा जिल्ह्याचे मोठे योगदान होते. ही आपणा सर्वांसाठी अभिमानाची बाब होय, असेही ते म्हणाले. आपल्या अध्यक्षीय मनोगतातून प्राचार्य सोनाये यांनी बजाजवाडी आणि परिसराचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान सांगितले. प्रारंभी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी आष्टी येथील १९४२ च्या आंदोलनावरील लघुपट ही दाखविण्यात आला. प्रास्ताविक डॉ. महेशकर यांनी केले. संचालन मोना मेश्राम तर श्रद्धा वाढेकर यांनी आभार मानले.

Nagpur, Vardha-Today
10/08/2018 Page No. 3

2) Dr. Babasaheb Ambedkar Birth Anniversary Special Lecture Dr. Niranjan Bramhne ( 16 April, 2019), on ***" Reservation : Facts and Myths".***




3) ***A Special Guest Lecture on Mahatma Gandhi*** ( 22 Feb. 2019 ) by Dr. Somnath Rode




लोकमत

संडे अँकर । प्रियदर्शिनी महिला महाविद्यालयातील व्याख्यानात सोमनाथ रोडे यांचे प्रतिपादन

# महात्मा गांधींबाबत भ्रम पसरविणाऱ्यांना ओळखा

लोकमत न्यूज नेटवर्क

**वर्धा :** महात्मा गांधींनी पाकिस्तानला ५५ कोटी दिले, त्यांनी भगतसिंगला फासावर जाऊ दिले, सुभाषचंद्र बोस व महात्मा गांधी यांच्यात शत्रुत्व होते, गांधी हे आंबेडकर व त्यांच्या समाजाला न्याय देऊ इच्छित नव्हते, असे गांधींबाबत अनेक भ्रम जाणीवपूर्वक पसरविणारी नथुरामी जमात सातत्याने कार्यरत आहे. त्यामुळे त्यांना ओळखून, रोखण्यासाठी आता सर्वांनीच हस्तक्षेप कारायला हवा, अशी अपेक्षा ज्येष्ठ इतिहासकार व हिंद स्वराज्य शताब्दी, महाराष्ट्रचे संयोजक प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, लातूर यांनी व्यक्त केली.



विचार व्यक्त करताना डॉ. रोडे, उपस्थित डॉ. सोनाये, बेलखोडे, डॉ. महेशकर

येथील प्रियदर्शिनी महिला महाविद्यालयात समाजविज्ञान अभ्यास मंडळाच्या वतीने महात्मा गांधी यांचे १५० वे जयंती वर्ष व कस्तुरबा गांधी स्मृतिदिनानिमित्त 'महात्मा गांधी : समज गैरसमज' या विषयावर आयोजित व्याख्यानाप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी प्राचार्य रंभा सोनाये, डॉ.प्रियराज महेशकर, वृक्षमित्र मुरलीधर बेलखोडे, डॉ. सुधाकर सोनोने, प्रा. दत्तानंद इंगोले उपस्थित होते. डॉ. रोडे म्हणाले, पाकिस्तानला ५५ कोटी देण्याचे भांडवल करणारे लोक ते पैसे देण्याच्या करारावर पंडित श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी स्वाक्षरी का केली होती आणि पाकिस्तानचा मुद्दा नसण्यापूर्वीच गांधींची हत्या करण्याचे पाच प्रयत्न का झाले होते, या प्रश्नावर मात्र गप्प राहतात. सुभाषचंद्र बोस असोत नाही तर आंबेडकर, त्यांच्यासोबत गांधींचे वैचारिक मतभेद होते, पण मनभेद नव्हते. म्हणूनच बोसांनी गांधींना 'राष्ट्रपिता' हे अजरामर संबोधन दिले. तर गांधींनी आग्रहपूर्वक आंबेडकरांचा समावेश स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात करून घेतला. एक कृती, ही हजार शब्दांहून अधिक बोलकी असल्याचे गांधीजी मानत असत. त्यामुळे त्यांच्या उक्ती आणि कृतीत समसमानता होती. म्हणूनच त्यांचा हा आदर्श घेत आता आपण सर्वांनीच बोलके सुधारक न होता कृतिशील कार्यकर्ते व्हायला हवे, असेही ते म्हणाले. गांधींच्या पुतळ्यावर गोळ्या झाडणाऱ्या प्रवृत्तीचा निषेध करीत डॉ.सोनाये यांनी समारोप केला. प्रास्ताविक डॉ. महेशकर तर संचालन व आभार प्रदर्शन डॉ. सोनोने यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता डॉ.अनिता देशमुख, डॉ.मालिनी वडतकर, डॉ. सोनाली शिरभाते, प्रा. अमोल घुमडे, प्रा. दीपक महाजन, विजय चौधरी, विनोद बावणे, दिनेश भगत, नरेश आगलावे, राजू मुंजेवार यांनी सहकार्य केले. पुलवामा येथील शहिदांना श्रद्धांजली वाहून व राष्ट्रगीत गाऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

Hello Wardha
Page No. 4 Feb 24, 2019
Powered by: erelego.com

**2019-20**

1) ***The World Indigenous People Day*** and ***August Kranti Din*** (09/08/2019)




सकाळ

# आदिवासींकरिता काळ कठीणच

## परिसंवादातील सूर; प्रियदर्शिनीमध्ये जागतिक मुलनिवासीदिन

**सकाळ वृत्तसेवा**

वर्धा, ता. २३ : आदिवासींच्या वनहक्क संरक्षणाकरिता आलेल्या २००६ च्या वनहक्क कायद्यातील त्रुटीमुळे सर्वोच्च न्यायालयाने जंगलाशी तीन पिढ्यांचा संबंध दाखवू न शकलेल्या १६ राज्यातील १२ लाख आदिवासींना जंगलातून विस्थापित करण्याचा निर्णय दिला. त्यावर सरकारचे मौन पाहता येणारा काळ आदिवासी मुलनिवासींकरिता कठीणच राहणार असल्याचा सूर येथील प्रियदर्शिनी महिला महाविद्यालयात जागतिक मुलनिवासी दिनानिमित्त भारतीय आदिवासी समाजापुढील प्रश्न, या विषयावर आयोजित परिसंवादातून उमटला.



**वर्धा : परिसंवादात आपले मत व्यक्त करताना विद्यार्थिनी, मंचावर उपस्थित मान्यवर.**

समाजविज्ञान प्रियराज महेशकर, डॉ. मालिनी वडतकर व प्रीती नायकवाड हे सहभागी झाले होते. याप्रसंगी वंचित अशा कोलाम आदिवासी समाजातून आलेल्या व शिक्षण घेणाऱ्या पहिल्या पिढीतील प्रीती नायकवाड या विद्यार्थिनीने गरिबीत जगणाऱ्या पण शिक्षणाची आस असलेल्या आदिवासी समाज-कुटुंबातील प्रश्न स्वकथनातून मांडले. डॉ. सोनोने व डॉ. सोनटक्के यांनी आदिवासींच्या जल, जंगल , जमीन, शिक्षण व सांस्कृतिकरणाचे प्रश्न उपस्थित केले. तर डॉ. महेशकर यांनी आदिवासींच्या वनहक्क संरक्षणविषयक कायद्याची चर्चा केली. या परिसंवादात शिक्षक व विद्यार्थी सहभागी झाले होते. राष्ट्रगीताने परिसंवादाची सांगता झाली.

2) Celebration of Independence Day (15/08/2019)




3) ***The World Teachers' Day*** (5/10/ 2019)



4) ***Human Right Day*** (10/12/1019)




सकाळ

# मानवी हक्कांबाबत भारतातील स्थिती गंभीर

## प्रियदर्शिनी महिला महाविद्यालयातील परिसंवादातील सूर; मानवाधिकारदिनानिमित्त आयोजन

सकाळ वृत्तसेवा

**वर्धा, ता. ११ : भारतात दररोज होणारे बलात्कार, शेकडो हत्या, दलित अत्याचारांची वाढती प्रकरणे, एक टक्के श्रीमंतांच्या हातात एकवटलेली साठ टक्क्यांपेक्षा अधिक संपत्ती, उत्तम जीवन जगण्याकरिता राहण्यायोग्य शहरांचा अभाव, अल्पसंख्याक समाजाची केली जाणारी मुस्कटदाबी हे सर्व पाहता आपल्या देशातील मानवी अधिकारांबाबतची स्थिती ही चिंतेच्या पलीकडे जाऊन गंभीर बनल्याचा सूर येथील प्रियदर्शिनी महिला महाविद्यालयात समाजविज्ञान अभ्यास मंडळाच्या वतीने जागतिक मानवाधिकारदिनानिमित्त आयोजित परिसंवादातून उमटला.**

या परिसंवादात राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मालिनी वडतकर, डॉ. प्रियराज महेशकर, डॉ. धनंजय सोनटक्के, डॉ. मृणालीनी बंड यांनी सहभाग घेतला. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रंभा सोनाये होत्या.



वर्धा : परिसंवादात विचार मांडताना डॉ. मालिनी वडतकर, उपस्थित प्राचार्य डॉ. रंभा सोनाये, डॉ. प्रियराज महेशकर, डॉ. धनंजय सोनटक्के.

या प्रसंगी मानवाधिकार रक्षणाकरिता जागतिक स्तरावर युनोच्या माध्यमातून होत असलेल्या प्रयत्नांनी तसेच भारतीय संविधानातून मिळालेल्या अधिकारांची माहिती देऊन डॉ. वडतकर यांनी हैदराबाद व उन्नाव येथील घटनांचा संदर्भ देत स्त्रियांचे भीतीयुक्त होत असलेल्या जीवनावर प्रकाश टाकला. तर डॉ. सोनटक्के यांनी एनकाऊंटर संस्कृती जर रुजली तर त्यात सर्वात आधी मानवी हक्कांचा बळी जाणार असल्याची बाब स्पष्ट केली.

एखाद्या शाळेत प्रसाधनगृह नसेल, गावात चांगले रस्ते नाल्या नसतील तर हे सुद्धा मानवी अधिकाराचे हननच ठरते, असे सांगून डॉ. महेशकर यांनी शासनाकडे विविध प्रकारे नागरिकांची होत असलेली मुस्कटदाबी व छळ हा मानवी अधिकार व लोकशाही मूल्यांवरचा घाला असल्याचे मत मांडले. चर्चेचा अध्यक्षीय समारोप करताना डॉ. सोनाये म्हणाल्या की, बहुतांश वेळा जे दिसते तसे असत नाही. त्यामुळे न्याय हा न्यायालयीन प्रक्रियेतून पण जलद गतीने मिळायला हवा तरच नागरिकांच्या मानवी हक्कांसाठी योग्य वातावरण निर्माण होऊ शकेल. या परिसंवादाचे संचालन डॉ. मृणालीनी बंड यांनी केले. आयोजनाकरिता डॉ. रेखा बोबडे व प्रा. अमोल घुमडे यांनी सहकार्य केले.

**Principal**
**Priyadarshini Mahila Mahavidyalaya, WARDHA**